केलें पूजन ॥ पंचाम नैवेद्य अर्पून ॥ मग आरती पैं केली ॥ ३७ ॥ पुष्पांजळि मंत्रघोष पुजारी समर्पिती देवास ॥ सत वैष्णव पात्रें कन्यांस ॥ वाढल्या उल्हास तेधवां ॥ ३८ ॥ नरनारी मिळोनि समस्त ॥ भानुदासाचें स्तवन करित ॥ म्हणती याच्या योगें वैकुंठ नाथ ॥ आहे पंढरीत आगुती ॥ ३९ ॥ एक हाकरा नगरांत वाटिती ॥ एक पंचामृतभोजन विप्रा घालिती ॥ क्षेत्रवासी लोकां प्रती ॥ आनंद चित्ती वाढला ॥ ४० ॥ जैसा चतुर्दशवर्षें वनवास कठोर ॥ अयोध्येसी आला रघुनंदन ॥ नगरवासी आनंदले जन ॥ तैसेंचि झालें सर्वांसी ॥ ४१ ॥ की अवर्षणी अकाळ होता पर्यंत ॥ त्यावरी मेघ वर्षला अपरिमित ॥ पंढरीचे लोक समस्त ॥ संतोष मानीत या रीती ॥ ४२ ॥ की अगस्तीच्या पोटांतूनी ॥ समुद्र निघाला देखूनि नयनीं ॥ मग मेघासी उल्हास वाटला मनीं ॥ तैसीच करणी झाली की ॥ ४३ ॥ नातरी वसंतकाळ येताचि त्वरित ॥ वनस्पती दिसती सुशोभित ॥ तैसी पंढरीस येतां अनाथ नाथ ॥ लोक समस्त आनंदले ॥ ४४ ॥ की शरीरांतील परतला प्राण ॥ मग इंद्रियें वर्तती सावधान ॥ पंढरीच सकळही जन ॥ तैशाचपरी जाहले ॥ ४५ ॥ पुढिले अध्यायी कथा सुरस ॥ ऐकतां यश जोडे निर्दोष ॥ म्हणूनि भक्त हो सावकाश ॥ जोड करा हेचि पैं ॥ ४६ ॥ हें सात्विक भक्तांचें महिमान ॥ वाढविता श्रीरुक्मिणीरमण ॥ महीपति त्याचा वंदीजन ॥ गातो सद्गुण कीर्तनीं ॥४७॥ स्वस्ति श्रीभक्तविजय ग्रंथ ॥ ऐकतां सुटेल जगआप ॥ प्रेमळ ऐका भाविक भक्त ॥ त्रिचत्वारिंशाध्याय रसाळ हा ॥ २४८ ॥

॥ अध्याय ॥ ४३ ॥ ॥ ओंव्या ॥ २४८ ॥

Appendix II

परिशिष्ट २.

विठ्ठलकविकृत भानुदासचरित्र.

(साक्या.)

यात्रा भरली पंढरपुरीं नाहीं पांडुरंग ।
म्हणती संतहि, 'कोठे गेला भक्तांचा भवभंग?' ॥ १ ॥

पडला संदेह सकळीकासी, 'का रे! उपेक्षा केली? ।
भेटी देई' म्हणति, प्रभूला 'आम्ही दीन भुकेलों.' ॥ २ ॥

विद्यानगरीं नेलें प्रभुला कळलें सर्व जनाला, ।
'आहा! दीनदयाळा! त्यजिलें, वाटे खेद मनाला.' ॥ ३ ॥

यापरि साधू तळमळती कीं चातक मेघालागीं, ।
खळवळलें पंढरपुर तेव्हां म्हणती 'आम्हि अभागी. ॥ ४ ॥

आहे ऐसा कोणि पराक्रमि भक्तशिरोमणि आता ।
घेउनि येइल त्वरितचि येथें रखुमाईच्या कांता?' ॥ ५ ॥

कोणि न बोले मात ऐकुनी, म्हणती. त्यजिलें देवें, ।
करा प्रार्थना, कांहीं हरिच्या चुकलों असलों सेवे.' ॥ ६ ॥

भानुदास बोलिला समस्तां, 'मी आणिन भगवंता. ।
कैसा जाइल देव त्यजुनिया? सांडावी तुम्हि चिंता.' ॥ ७ ॥

नमन करुनियां मग सकळांसी भानूदास निघाला. ।
चाले चपळगतीनें तेव्हां विद्यानगरा आला. ॥ ८ ॥

जननी चुकतां तान्हें जैसें दीनपणानें पाहे, ।
त्यापरि भानूदास कृपाधन मंजुळवाणी बाहे. ॥ ९ ॥

वाजंत्र्याच्या ध्वनी उमटती दुंदुभि वाजति नाना ।
दृष्टि परेना कोठें हरि तो, फिरती मुरस सनाना ॥ १० ॥
प्रभातपूजा केलि नृपानें, न घडे फाणा मेत्री, ।
ससहि द्वारें केली द्द म, पुरुषानें जसि पटी ॥ ११ ॥
ऐसें कौतुक पाहुनि बोले भानुदास, 'श्रीरंगा' ।
घरा येउनी येथें बसला सांडुनि सकळहि संगा ॥ १२ ॥
अम्हां अनाथां कोण पुसे ? हरि' भागवत झाल्यासी, ।
पडून अन्नें पाहुनि यर्ची भक्षावा आल्यासी ॥ १३ ॥
आम्ही भक्त तुझे अतिदुर्बळ माझ घुका तुज वाटू, ।
या नृपाच्या उपचारांतें स्वप्नीं कदापि न पाटू ॥ १४ ॥
यासाठीं तू येथें स्पष्ट दाउनि राहसि, देवा'' ।
ऐसें म्हणतां भानुदासें काय वर्तलें तस्थां ॥ १५ ॥
झालि निशा, अति तमें दाटली, चिंता करि रंगदास ।
जोडुनियां कर उभा तिष्ठतो 'चाल' म्हणे देवास ॥ १६ ॥
'आतां न घरीं भीड तुझी मी, कां ध्याटासी पोरें ! ।
टाकुनि येता लाज न धरिली, ऐसें न किजे थोरें ॥ १७ ॥
आम्हांवांचुनि गति तुज नाहीं, छायीं न करीं फजीती, ।
दुष्ट नष्ट लेंकुरें असति तरि त्यांतें काय त्यजीती ?' ॥ १८ ॥
ऐसीं करुणावचनें ऐकुनि काय करी वनमाळी ।
सघन केली होति पयारें, उधडति ध्यावया टाळीं ॥ १९ ॥
डोळे उघडुनि पाहे तेव्हां देखियलें भगवंता, ।
शिरला आंत, तसा मग बोले, 'हरली सकळहि चिंता' ॥ २० ॥
साष्टांगें चरणावरतें हा घालि मिठी रविदास ।
अश्रुजळानें पद प्रक्षाळी, आनंद हृदयास ॥ २१ ॥

दोघां भेटी होतां बोले, 'कां पंढरिच्या कंटाळा? ।
कां हो हरि बैसला उगाचि? वश झालासि नृपाळा?' ॥ २२ ॥

देव म्हणे, 'मज बंदि घातलें, अंतरलों शरिभागा, ।
भीमातिर पंढरपुरनगरी नाहि असी दुजि जागा.' ॥ २३ ॥

यापरि हरि अनुवादुनिया मग काढी माळ गळ्याची ।
घाली भास्करदासा कंठीं आवडि रत्नफळाची. ॥ २४ ॥

बाहिर निघतां दास बोलिला, 'द्या मज भेट सकाळीं.' ।
उघडीं केलीं होति कवाडें, बसलीं दृढतर टाळीं. ॥ २५ ॥

प्रातःकाळीं स्नानालागीं भानुदास मग जात ।
आठवि अंतरि कमळापतिला नाम मुखानें गात. ॥ २६ ॥

स्नान करुनिया घालुनि आसन निमग्न बसला ध्यानीं ।
ठेवुनिया चित्त पांडुरंगीं आळविला हरि त्यानीं. ॥ २७ ॥

देवार्चन नृप करावयासी आला लगबग भारी ।
माळ पहातां न दिसे कंठीं ताडित फार पुजारी. ॥ २८ ॥

चोर पहाया धावति सेवक शोध करिति गांवाचा ।
दासाकंठीं माळ पहातां 'चोर' म्हणति हा साचा. ॥ २९ ॥

ताडण करिती नृपसेवक त्या आणिला रायापाशीं ।
मग सक्रोधें बोले नृप तो, 'घाला शुळशिखराशी.' ॥ ३० ॥

चालविला मग शुळाजवळि तो म्हणे, 'ऐक नृपनाथा! ।
भेट घेउं दे मज देवाची, चरणीं ठेविन माथा.' ॥ ३१ ॥

येतां प्रभुसन्निध मग त्यानें नमन पदांबुजि केलें ।
म्हणे, 'भला तूं पंढरिराया! बरें मला हित केलें. ॥ ३२ ॥

आतां देवा! लोभ असों द्या, आठव हृदयिं धरावा, ।
केली युक्ती तुम्हि मज कळलें भानूदास मरावा. ॥ ३३ ॥

परि तुज जन्मोजन्मिं न सोडीं हा निश्चय भक्ताचा ।
असे, बरें त्वां केलें देवा! खेळ जसा भक्ताचा’ ॥ ३४ ॥
वेसीवरती शूल रोंविला, म्हणे, ‘सद्यावरि घाला’ ।
सच्चिद्घनसुख पूर्णकृपाकर आठवि हृदयिं निघाला ॥ ३५ ॥
दासाचा कळवळा तेव्हां कळवळला मनि भारी ।
फळ झाला सत्वर, नेत्रीं वाहति मग निर्धारी ॥ ३६ ॥
‘गांजिती कोण वळी मम भक्तां?’ धावे हरि समपाटा ।
सावरिला अपुल्या वचनातें, धावत हरिसम आला ॥ ३७ ॥
पळत पुढें पाव्युनियांमग अकस्मात दिसताहे ।
सेवकजन सांगती नृपासें, जाउनी नयीं पाहे ॥ ३८ ॥
विस्मय वाटे सकळां चित्तीं रामराय पदिं लागे ।
जोडुनि करकमळांतें भानूदासा अभयचि मागे ॥ ३९ ॥
आले पांडुरंगापाशीं दोघे भक्त, विनंती ।
करिते झाले, सद्गद तेव्हां कंठ, हरी करि खंती ॥ ४० ॥
‘कोणी माझा भक्त गांजिला सांगे भानूदासा!’ ।
आलिंगुनियां देवें त्याप्रति तत्काळि जैसा मासा ॥ ४१ ॥
‘आतां देवा! चला पंढरी, बैसुनियां मम पाठीं ।
नाहीं तर हा रामराय तुज काढिल युक्ति प्रवादि’ ॥ ४२ ॥
ऐकुनि ऐसी मात नृप म्हणे, ‘का हो! उपेक्षा माझी ।
करुनी आतां पानवरावरि त्यागुनि मजला आजी’ ॥ ४३ ॥
देव म्हणे, ‘मी अपुल्या वचना सत्य करुनियां आतां ।
जातों, लोभ असों दे, मजवर क्षोभुं नको, नृपनाथा’ ॥ ४४ ॥
रविदासानें वसवुनि खांदीं, पंढरीस मग जात ।
भक्त धांवती देव पहाया ‘आला’ ऐकुनि मात ॥ ४५ ॥

दिव्य पताका उभवुनि तेव्हां संत नाचती नाना ।
सर्वा अंतरि हर्ष न माये करिती सुरस तनाना. ॥ ४६ ॥
लोक धावती बहु नगरीचे लोळति दीसापाई ।
'धन्य धन्य तूं या लोकातें दाविलि बहुत नवाई.' ॥ ४७ ॥
सर्व मिळुनियां देव बसविला नेवुनि आपुल्या गादी ।
भरली यात्रा फारचि तेव्हा गाती ऐकति नादी. ॥ ४८ ॥
कोणी करिती देवपूजना, कोणी नाचति छंदें, ।
कोणी भानूदास वर्णिती गाउनि गीत अनंदे. ॥ ४९ ॥
कोणी ऐकत बसले तेथें, कोणी पुराण वाची, ।
कोणी करिती स्नाने दाने, स्तुति करिती देवाची. ॥ ५० ॥

उपसंहार.

यापरि झाला मोद बहूतचि विठ्ठल केशवपायीं ।
छद जडला, मग संतचरित्रे भक्ताचे गुण गाई. ॥ ५१ ॥

Appendix III

परिशिष्ट ३

केशव स्वामी कृत श्री एकनाथस्वामींचे चरित्र

चतुर्दशीचें कीर्तन ॥ महाद्वारी करोनि आपण ॥ हें पांडुरंग आज्ञावचन ॥ प्रतिपाळण करावें ॥ ४३ ॥ कैसी आज्ञार्थाचें कारण ॥ सविस्तर सांगावें निरोपण ॥ ऐकतांचि श्रीनाथ प्रश्न ॥ चरित्र प्राचीन वर्णिती ॥ ४४ ॥ पूर्वी कोण्हेकाळीं येथ ॥ चरित्र जाहलें अत्यद्भुत ॥ तें परिसावया श्रीनाथ ॥ देत चित्त सादरत्वें ॥ ४५ ॥ विद्यानगरी राज्यप्राप्ती ॥ रामराजा भक्त मूर्ती ॥ अति भावार्थी विठ्ठल भक्ती ॥ केली त्याप्रति नवलाव ॥ ४६ ॥ प्रार्थुनि पांडुरंगासी ॥ म्हणे चलावें मम नगरासी ॥ धरणें बैसोनि दिवानिशी ॥ करी उपवासासी सत्पात्र ॥ ४७ ॥ देव भिचाचा कोंवळा ॥ आज्ञापिलें समावेळा ॥ एके दिनीं आणि सोंवळा ॥ नेसीं प्रेमळा सरीच घडे ॥ ४८ ॥ या दोन नेमा विरहित ॥ माझें येणें न घडे निश्चित ॥ रायें ऐकोनिया मात ॥ परिक्षा विचारार्थ यदर्थी ॥ ४९ ॥ बोलावूनि सुबुद्धि प्रधान ॥ सांगे कोर्डे देववचन ॥ प्रधानें विचारोनि मना ॥ म्हणे विज्ञापना अवधारीं ॥ ५० ॥ देवें घाळूनि कोडें प्रबळ ॥ पाहतसे तुझ्या भक्तीचें बळ येथें बुद्धि एकचि प्रांजळ ॥ ते निश्चळ परिसावी ॥ ५१ ॥ स्वराज्य देशांतीळ समस्त ॥ लहान थोर विप्र येथ ॥ आणवूनि सुनिश्चित ॥ विनीत व्रत विचारावें ॥ ५२ ॥ आज्ञिया समस्तांच्या मना पटरीहून स्वस्थाना ॥ पर्यंत तया ब्राह्मणां ॥ सोंवळेंचि जाणा उभे कीजे ॥ ५३ ॥ हातोहातीं देवासी ॥ देवोनियां सायंकाशीं ॥ अविश्रम त्या दिवशीं ॥ स्वस्थानासी पैं न्यावें ॥ ५४ ॥ कुशळ बुद्धि ऐकोनि

कानीं ॥ राजा संतोषला मनीं ॥ त्वरे आज्ञापत्र देउनी ॥ दूतां लागुनी पाठविलें ॥ ५५ ॥ आपुल्या राज्यांतील ब्राह्मण ॥ समस्त लहान थोर आणुन ॥ अविनित मृदु प्रश्न ॥ हें कार्य आपण निवेदिलें ॥ ५६ ॥ राजआज्ञा आणि परमार्थ ॥ समस्त हे अंगिकारित ॥ दिवस एक नेमुनी त्वरित ॥ पथीं राहवीत ग्रामातरीं ॥ ५७ ॥ पंढरीहून स्थानपर्यंत ॥ अन्नोदक संस्था यथास्थित ॥ गावोगावीं करवी नृपनाथ ॥ अति विनीत द्विजभक्ती ॥ ५८ ॥ नेमले दिवशीं ब्राह्मण ॥ स्वस्थळीं करूनि स्नान ॥ मार्गावरी हो येऊन ॥ सोंवळेच जाण उभे ठाकती ॥ ५९ ॥ राजा प्रधान पादचारी ॥ पंढरी प्रासादा भीतरीं ॥ येऊनि साष्टांग नमस्कारी ॥ विनति करी देवासी ॥ ६० ॥ आज्ञेप्रमाणे निश्चिती ॥ सोवळे ब्राह्मण उभे असती ॥ कृपा करोन शीघ्र गती ॥ चलावें म्हणती विठ्ठला ॥ ६१ ॥ विनवोनियां ऐशा रिती ॥ ब्राह्मणासी म्हणे नृपती ॥ देवासी उचला हातोहातीं ॥ स्वस्थानाप्रती पाववा ॥ ६२ ॥ आग्रह करितां देव ॥ ब्राह्मणासी उचले स्वयमेव ॥ हातोहातीं ब्राह्मण सर्व ॥ नेती नवलाच कौतुकें ॥ ६३ ॥ श्रम न होतां कोणासी ॥ देव नेऊन एक्या दिवशीं ॥ पावविला त्या स्थानासी ॥ निज नेमेसीं उचलोनी ॥ ६४ ॥ राजा येऊनि आपण ॥ रत्नजडित सिंहासन ॥ प्रासादें निजकरें मांडून ॥ वरीं स्थापना करी देवा ॥ ६५ ॥ नानावस्त्रें अलंकार ॥ सुवर्ण रत्नमय विचित्र ॥ गळा नवरत्नाचे हार ॥ शोभा अपार पैं केली ॥ ६६ ॥ षोडशोपचारी पूजा ॥ सुगंध द्रव्य अति वोजा ॥ पूजोनिया अधोक्षजा ॥ वाजंत्रवाजा गजरेसी ॥ ६७ ॥ समस्त ब्राह्मण सतर्पण ॥ यथाविधीं अति दिव्यान्न ॥ देऊनि तया भोजन ॥ वस्त्र गौरवून अति प्रीती ॥ ६८ ॥ भिक्षुकांसी दक्षिणा दान ॥ देऊनि तोषविलें ब्राह्मण ॥ आशीर्वाद मुखें गर्जोन ॥ नृपतीसी पुसोन पै गेले ॥ ६९ ॥ देव प्रासाद बळकट ॥ तीन पोंवळ्यासह कपाट ॥ कड्या कुलपें घनदाट ॥

फेली खटपट दुष्टतेची ॥ ७० ॥ पूजेही मेसिहे भाजण ॥ त्यांचा निर्वाह सदगुरुंचे जाण ॥ फोणासी न यावे क्षीण ॥ तेंचि समावेना फरीतसे ॥ ७१ ॥ त्रिकाळीं पूजा नेमस्त ॥ साहित्य अति यथोक्त ॥ राजाही त्रिकाळ दर्शन घेत ॥ अति विनीत मक्तीसी ॥ ७२ ॥ यापरि मास्यविळास ॥ देव भोगी सावफाश ॥ येरीकडे पदरीस ॥ यात्रा दिव न पैं आला ॥७३॥ वार्षिक यात्रेची यापरी ॥ यात्रा दाटली नरनारी ॥ सत्पुरुष मंडळी स्वनिर्धारी ॥ आले पदरीसें ऐका ॥७४॥ नामदेव अति आवडत ॥ दृष्टिपाळ देवाचा सतत ॥ निवृत्ति ज्ञान सोपाननाथा ॥ देवही माया वर्धतसे ॥ ७५ ॥ सांवता माळी कुंभार गोरा ॥ या मक्तांच्या मुख्य धुरा ॥ चोखामेळा अति शूद्रा ॥ सर्गे दोरा योगी देव ॥ ७६ ॥ ज्ञानी विसोबा खेचर ॥ नामदेवाचा गुरु साचार ॥ भानुदास अति प्रियकर ॥ आवडता फार देवाचा ॥ ७७ ॥ नामदेवाचे चौघे पुत्र ॥ आणिकही एहान थोर ॥ यांसी मिळाले अपार ॥ करीत जयजय कार नामाचा ॥ ७८ ॥ तंव देव नेटियाचों वार्ता ॥ वदवे सांगती उद्विग्नता ॥ निस्तेज पदरी देवता ॥ सर्वांसी चिंता पैं जाली ॥ ७९ ॥ वदवे म्हणती संतांप्रती ॥ तुम्हासारिख्या थोर मूर्ती ॥ असता देव गला हातीं ॥ हे ख्याति राजयाची ॥ ८० ॥ तंव निवृत्ति श्रीज्ञानदेव ॥ म्हणती नवल जाहलें अपूर्व ॥ धन्य नृपतीचें वैभव ॥ केवीरें देव पैं नेला ॥ ८१ ॥ नामा अथवा भानुदास ॥ अवश्य आणितील देवास ॥ बोलावूनियां उभयतांस ॥ या विचारास योजावें ॥ ८२ ॥ एक विचारें समस्त ॥ त्या उभयतां बोलाविंत ॥ देव आणिला पाहिजे त्वरित ॥ भक्तिमार्गें प्रतापें ॥ ८३ ॥ तंव भानुदासें सम स्तांसी ॥ वंदोनि अति उल्हासी ॥ म्हणे आज्ञाप्रतापें पंढरीसी ॥ घेऊनि देवासी येतसों ॥ ८४ ॥ मानलें सकळांच्या चित्तीं ॥ सन्मानूनि निरोप देती ॥ सत्य घेऊनि संतमूर्ती ॥ शीघ्र गति चालिला ॥ ८५ ॥ संत आणि यात्रा समस्त ॥ निवांत होऊनि वाट पाहात ॥

भानुदास नृप नगरांत ॥ पावोनि राहात दुकानीं ॥ ८६ ॥ तेथील पाहिला वृत्तांत ॥ तंव देवासी अर्गळा बहुत ॥ कोणी नवा प्राणी तेथ ॥ आज्ञेविरहित जाऊं नपवे ॥ ८७ ॥ देव पडला बंदिखानीं ॥ भानुदास विव्हळ मनीं ॥ कार्य साधे कैसेनी ॥ आठवी मनीं विठ्ठल ॥ ८८ ॥ ऐशा परी चिंताक्रांत ॥ होता लोटली अर्ध रात्र ॥ भानुदास जव लक्षित ॥ निवळ एकांत दिसतसे ॥ ८९ ॥ निद्रिस्थ जालें सकळ जन ॥ आतां पाहावा करूनि प्रयत्न ॥ दुकानींहूनि उठोन ॥ देवद्वारीं जाण पातला ॥ ९० ॥ कपाटासी लावितां हात ॥ तंव तें सहज मुक्त होत ॥ प्रवेश करुनी आत ॥ मागुती लोटित कपाटा ॥ ९१ ॥ याचिपरी दुसरी पोवळी ॥ कपाटां उघडी ते काळीं ॥ मुख्य प्रासादा जवळीं ॥ येऊन त्याहाळी कपाटा ॥ ९२ ॥ तव लख-लखाट तेजदीसी ॥ सुवर्ण बुटी भिंती शोभती ॥ कवाडेंही तेचि स्थिती ॥ दैदीप्य दिसती डोळिया ॥ ९३ ॥ भानुदासें स्पर्शितां हात ॥ मुख्य कपाट मुक्त होत ॥ हर्षयुक्त आनंद चित्त ॥ स्वयें जात भीतरीं ॥ ९४ ॥ कर्पूर दीपिका चहूं कोनीं ॥ लखलखाट उजेड नयनीं ॥ रत्नजडित सिंहासनीं ॥ देव चूडामणी विठ्ठल ॥ ९५ ॥ देखतांचि श्रीमूर्ती ॥ थोर आनंद जाला चित्तीं ॥ क्षुधे तृषेची खंती ॥ हरपोनी विश्रांति पावला ॥ ९६ ॥ पांडुरंगे अतितातडी ॥ घातली सिंहासनाहुनी उडी ॥ भानुदास अति आवडी ॥ हृदयीं परवडी कव-ळिला ॥ ९७ ॥ बहुकाळें भेटतां बाळा ॥ मातेसी जैसा कळवळा ॥ अश्रुधारा स्रवती डोळां ॥ देव कोवळा चित्ताचा ॥ ९८ ॥ भानुदासा पडले ठक ॥ तटस्थ ठेला क्षण एक ॥ देवें थापटूनि देख ॥ आलिं-गूनि कौतुक पैं केलें ॥ ९९ ॥ सावध भानुदास होतां ॥ पायांवरी ठेवोनि माथा ॥ स्फुंदस्फुंदोनी आक्रंदतां ॥ प्रेमावस्था नावरे ॥ १०० ॥ कुरवाळोनी स्वहस्तें ॥ सुख अर्पी तयातें ॥ म्हणे आवरोनि प्रेमातें ॥ गुजहितातें बोलावें ॥ १ ॥ प्रेमावस्था जिरवोनि पोटीं ॥ सांगों लागे

गुजगोष्टी ॥ कार्य होतें जें पोटीं ॥ अमा मोठी निजनसे ॥ २ ॥
॥ अभंग ॥ चंद्रभागा तिरीं उभा विटेवरी ॥ विठो धन्य करी पंढरीचे
॥ १ ॥ ऋद्धि सिद्धि वोळंगती परिवार ॥ न लाहती अमर महादिक
॥ २ ॥ सांडुनि तिजके व्यर्थ यांत केले ॥ पतणे पाळीले कावया
॥ ३ ॥ शंख भेरी मृदंग वाजती फाहळा ॥ ढमढ ताळ्या होतसे ॥
॥ ४ ॥ चापिठ मार्जन गुगुळ चर्चून ॥ गंमित चंदन यात पाद ॥ ५ ॥
रंभा तिलोत्तमा उर्वशी मनीका ॥ पद्मिनी आणिका येती सेव ॥ ६ ॥
पलंगाचे पर्यंकीं रत्नाचे दीपक ॥ हरोनि श्रीमुख वोवाळिती ॥ ७ ॥
रखुमाई आई ते जाती उ प्रेम ॥ येतें पुण्डलिकास गौन पटलें ॥ ८ ॥
भक्त भागवत सकळ पाळ्याळ ॥ नि शब्दें त टळ सुजाणें ॥ ९ ॥ धन्य
पंढरपूर विश्रांती मंदिर ॥ धन्य भीमातीर वाळुवंट ॥१०॥ भानु म्हणे
चाल आलाम्हें ॥ यात्रा अगदेवं आव्यार्थ ॥ ११ ॥ ओवी ॥ वापरी
मांडूनि देवासी ॥ तचि काळीं सांधी पापासी ॥ मार्फे गोविंद विठ्-
ठलासी ॥ लगे येतों सगेनी पें तुल्या ॥ ३ ॥ आगीक देत वरदान ॥
तुम्ही वर्शी अवतरण ॥ मीन्यर्थे करीन आपण ॥ करीता जन उद्धार
॥ ४ ॥ भाषासूनि भानु प्रेम ॥ म्हणे स्वस्थ जावें निद्रा जास ॥ उदईक
होईल विलास ॥ ता सावका । छ्राया ॥ ५ ॥ आवडीच्या सोरसीं ॥
निज पर्ळीच्या माळेसी ॥ प्रसा भानु स्मामी ॥ घालून गळ्यासी मोक-
विलें ॥ ६ ॥ पुष्प तुळसी हारातें ॥ रत्नमाळा गळा येत ॥ भानुदासी
नसे विदित ॥ स्वयें जात निजानंदें ॥ ७ ॥ उरली रात्र कमिल्यावरी ॥
उप काळीं नदी तिरीं ॥ विणा घाकूनि खांचावरी ॥ स्वानंदें करी कीर्तन
॥ ८ ॥ पेरीकडे कांकड आरती ॥ करावया यडवे येती ॥ निर्माल्य
विसर्जितां माळेप्रती ॥ गळां न देखती देवाच्या ॥ ९ ॥ देवाचा नव
रत्न हार ॥ चोरी गेला हें उत्तर ॥ राजा ऐकोनि चिंतातुर ॥ होऊनि
सत्वर बोल्लिा ॥ ११० ॥ समस्त सेवकजनीं आतां ॥ शोध कीजे
अति सत्वरता ॥ रत्नहार पाया सत्वतां ॥ तरीच सेवका उपयोगी

॥ ११ ॥ ऐकता निग्रह राजवाणी ॥ सेवक निघाले गवेषणी ॥ नगरीं आणि बाह्य स्थानीं ॥ धावले सत्वर सज्जुनी हत्यारें ॥ १२ ॥ तव नदीतिरीं भानुदास ॥ हरिभजनीं अति उल्हास ॥ सुखें बैसला साव-काश ॥ गळा माळेस पाहिले ॥ १३ ॥ संतोषभानुनी सेवकजन ॥ रत्न-माळा घेती हिरोन ॥ चोराचें समूळ लक्षण ॥ केलें निवेदन भूपतीसी ॥ १४ ॥ अविवेक बुद्धि राजयासी ॥ काहीं न पुसता शोधासी ॥ सुळीं धावे चोरासी ॥ या आज्ञेसी बोलिला ॥ १५ ॥ ईश्वरमायेचे कैवाड ॥ म्हणोनि बुद्धि जाली जड ॥ जिवीं संपत्तीची चाड ॥ म्हणोनि हे द्वाड जल्पला ॥ १६ ॥ सुळीं द्यावया चोर ॥ भानुदासासी धरिती हेर ॥ येरू मनीं निर्विकार ॥ शंका अणुमात्र न करीच ॥ १७ ॥ सुळा जवळीं नेऊन त्यासी ॥ म्हणती आठवावे देवासी ॥ ते काळीं अभंगासी ॥ अति उल्हासीं बोलिले ॥ १८ ॥ अभंग ॥ आकाशवरी पडों पाहे ॥ ब्रह्मगोळ भंगा जाय ॥ वडवानळ त्रिभुवन खाय ॥ तरि मी तुझीच वाट पाहें विठोबा ॥ १ ॥ आणिकाचा न करीं पागिला ॥ नामधारक तुझाची अंकेला ॥ धृ० ॥ सप्तहि सागर समरस होती ॥ तैं हे विरोनि जाय क्षिती ॥ पंचमहाभूतें प्रळय पावती ॥ तै तूंचि सांगाती विठोबा ॥ २ ॥ मलतेंसें जड पडो भारी ॥ परि नाम न सांडी न टळे निर्धारी ॥ पतिव्रता जेवि प्राणेश्वरी ॥ देवा भानुदास म्हणे निर्धारी गा विठोबा ॥ ३ ॥ ओवी ॥ अभंग ऐकता सकळा ॥ पल्लव फुटला तया शूळा ॥ देखताचि नवललीळा ॥ केले नृपाळा निवेदन ॥ १९ ॥ ऐकोनि दूताची वाणी ॥ राजा आश्चर्य करी मनीं ॥ म्हणे ऐसी अघटित करणी ॥ भक्तावाचोनि कोणाची ॥ १२० ॥ चोर नव्हे तो पूर्णभक्त ॥ आता व्हावे शरणागंत ॥ पुसोनि त्याचें मनोगत ॥ पुरवूं आर्त पै त्याचें ॥ २१ ॥ उठोनि सत्वर निजगती ॥ अनवाणी धावे नृपती अनुताप-युक्त काकुळती ॥ येऊन करीत दंडवत ॥ २२ ॥ कोण कोठील स्वामि-राया ॥ कोठोनि आलासी या ठाया ॥ अचाट दाविली हे क्रिया ॥ कोणे

कार्या कारणें ॥ २३ ॥ मीं तव अपराधी पतित ॥ येवढें आचरलों दुरित ॥ दीनदयाळू तुम्ही संत ॥ शरणागत मीं आलों ॥ २४ ॥ भानुदास माझें नाम ॥ पंढरीहून आलों आनग ॥ देवदर्शना भाव धरून ॥ केल्या हें चिन्ह प्रगटलें ॥ २५ ॥ पंढरीस न्यावा देव ॥ हा माझा पूर्वभाव ॥ थोरथोर महानुभाव ॥ यात्रा सर्व मिळाली ॥ २६ ॥ समस्तीं मज आज्ञापून ॥ पाठवावयाचें हेंच कारण ॥ ऐकतांचि नृपतिप्राण ॥ देहातून जाऊं पाहे ॥ २७ ॥ विन्हळित झालें मन ॥ आक्रंदें करी रूदन ॥ व्यर्थ श्रम झाले माझन ॥ मति उद्विग्न पैं जाली ॥ २८ ॥ भानुदासासी ओढागण ॥ धाडूनि करव्या विज्ञापन ॥ म्हणें इतुकी गोष्टी करूनि भिन्न ॥ सर्व राज्य देईन हें ॥ २९ ॥ भानुदास ऐकोनि वाणी ॥ म्हणती हे देवाची करणी ॥ कैंचें सामर्थ्य कल्पना मनीं ॥ मजलागुनी न करवे ॥ १३० ॥ जैसें देवाचें मनोगत ॥ तैसीच वर्त णुक होत ॥ इतुकें बोलोनि निवांत ॥ स्वयं राजा विनवित मागुती ॥ ३१ ॥ धाडूनि ओढागण ॥ घ्यावें माता देवदर्शन ॥ प्रासादीं सन्मानें नेऊन ॥ मूर्तीचें ध्यान पाहताती ॥ ३२ ॥ म्लान वदन कळाहीन ॥ जळें वाहती लोचन ॥ स्वयें देखोनि दुश्चिन्ह ॥ मूर्च्छित जाण पडियेला ॥ ३३ ॥ म्हणे कटकटा थरारे ॥ अदृष्ट झालें पैं खोटें ॥ देव रूसला हें मोठें ॥ दुःखें फुटे जिव्हार ॥ ३४ ॥ ऐसिये अवस्थे आंत ॥ शब्द ऐके अकस्मात ॥ मज ठेविता निग्रहें येथ ॥ पावसी अनर्थ रोकडा ॥ ३५ ॥ मनीं म्हणें येकाळीं देव ॥ निजस्थाना जावया स्वयमेव ॥ इतुकें रचितसे लाघव ॥ फिरलें दैव पैं माझें ॥ ३६ ॥ निश्चय देखोनी देवाचा ॥ राजा बोलतसे वाचा ॥ सोवळ्यानें आणिला साचा ॥ तैसाचि न्यावयाचा असे नेम ॥ ३७ ॥ परिसोनि राजयाचें वचन ॥ भानुदास बोलतसे खूण ॥ आळवून वाचाकरण ॥ व्हावें लहान ये काळीं ॥ ३८ ॥ आपण करूनि स्नान ॥ नेसूनि सोवळें वसन ॥ देवासन्निध होऊन ॥ उचलित जाण निज करें ॥ ३९ ॥ तव विती प्रमाण मूर्ती ॥ झाली ते काळीं

आकृती ॥ नवल देखतसे नृपती ॥ आश्चर्य चित्तीं चमत्कारला ॥ १४० भावें धन्य भानुदास ॥ सकळ पाहती हा विलास ॥ खांदीं वाहून देवास ॥ नमून नृपतीस चालिला ॥ ४१ ॥ कोठें न राहून स्थीर ॥ अहर्निशीं निरंतर ॥ पंथ क्रमूनि सत्वर ॥ गोपाळपुर पावला ॥ ४२ ॥ हर्षें निर्भर निजमानस ॥ देखोनिया पंढरीस ॥ लोटांगण सावकाश ॥ घालीत उल्हास हृदयकमळीं ॥ ४३ ॥ देव लाघवी विचित्र ॥ कैसे केलें चरित्र ॥ भानुदास भक्त पवित्र ॥ येत सत्वर पंढरीये ॥ ४४ ॥ प्रसन्न वदन पाहून त्यासी ॥ अति उल्हास सर्वत्रासी ॥ ज्ञानेश्वरादि महंतासी ॥ लोटांगणेसी वंदिले ॥ ४५ ॥ जालिया वृत्तातांचें कथन ॥ समस्त संतासीं देखून ॥ केले तेणें धन्य धन्य ॥ वंदोनि आलिंगन दिधलें ॥ ४६ ॥ जयजयकाराची ध्वनी ॥ नाद न माये गगनीं ॥ मंगळवाद्यें मिरवुनी ॥ विठ्ठल स्वस्थानीं स्थापिला ॥ ४७ ॥ तोचि हा पंढरिनाथ ॥ अद्यापि उभा असे समर्थ ॥ स्वामीचा प्रपितामह येथ ॥ स्वकरें स्थापित देवासी ॥ ४८ ॥ हा इतिहास पुरातन ॥ श्रीनाथासी निवेदुन ॥ समस्तीं वंदुनी चरण ॥ वानिता महिमान निजमुखें ॥ ४९ ॥ आता चतुर्दशीचे कीर्तन ॥ श्रीवदनीचे निरोपण ॥ श्रवणें करावे पावन ॥ आज्ञा वचन देवाचे ॥ १५० ॥ येथुनी चतुर्दशीचे दिवशीं ॥ कथा समर्याची या नेमास ॥ पांडुरंगाचा विलास ॥ मान्य सर्वास पैं जाला ॥ ५१ ॥ नाथें आलिंगुनी समस्ता ॥ ह्मणे धन्य धन्य तुमची आस्था ॥ या दिवसाचिया वृत्ताता ॥ साकल्य आचरिता ऐकविलें ॥ ५२ ॥ प्रसंगें आमुच्या पूर्वजाचें ॥ वर्तमान होतें साचें ॥ ऐकवूनि प्रेम तयाचें ॥ केलें मनाचे समाधान ॥ ५३ ॥

Appendix IV

परिशिष्ट ४

भानुदास भक्तलीलामृत

अध्याय १८

तव केळणी प्रश्न करिती त्यांस ॥ तुमचा पूर्वज भानुदास ॥ त्याचें चरित्र असे सुरस ॥ गायानि आम्हांस ऐकवा ॥ ७४ ॥ ऐसा श्रोतयांचा प्रश्न ऐकोनी ॥ श्रीनाथ संतोषले मनीं ॥ म्हणती हेंचि होतें आमुचे मनीं ॥ त्यावरी स्वामींनी आज्ञापिलें ॥ ७५ ॥ रामराजा विद्यानगरी ॥ परिवारेंसी राज्य करी ॥ तो एके दिवशीं करोनि स्वारी ॥ क्षेत्र पंढरी पावला ॥ ७६ ॥ श्रीपांडुरंगमूर्ति पाहोनि सुंदर ॥ चित्तीं आवड बैसली फार ॥ म्हणे आपुलें गांव विद्यानगर ॥ रुक्मिणीवर तेथें न्यावा ॥ ७७ ॥ ऐसी कल्पना आणोनि मानसीं ॥ सात दिवस बैसले उपवासी ॥ तव स्वप्नीं येऊनि हृषीकेशी ॥ आज्ञा तयासी करिते ॥ ७८ ॥ आम्ही पुंडलीकाची भक्ति विशेष ॥ देखोनि पंढरीस केला वास ॥ भाकवचन देऊनि त्यास ॥ भाविकजनांस भेटतसों ॥७९॥ ये स्थळीं चित्त रमतसे ॥ ऐसी विश्रांति कोठें नसे ॥ क्षीरसागरीं आमुचा वास ॥ वैकुंठही दिसे उणेंची ॥ ८० ॥ येथें भाविक भक्त प्रेमळ ॥ यात्रेसि येती सर्वकाळ ॥ त्यांच्या संगतीनें मी घननीळ ॥ सांडोनि तळमळ राहिलों ॥ ८१ ॥ ऐसें असतां रामराया ॥ तुवां निग्रह मांडिला वायां ॥ आतां विद्यानगरासि न्यावया ॥ सांगतों उपाया त्याकरीं ॥ ८२ ॥ शुचिर्भूत सोंवळे होऊन ॥ ब्राह्मणीं उचलावें मज आणुन ॥ मार्गावरी खालीं न ठेवणें ॥ तरीच येईन त्या ठायां ॥ ८३ ॥ ऐसें स्वप्न देखतां रातीं ॥ राजा परम हर्षला

चित्तीं ॥ मग प्रधानासि पुसे एकांतीं ॥ आतां युक्ति कोणती करूं सांग ॥ ८४ ॥ मंत्री देतसे प्रतिउत्तर ॥ आपुले देशींचे द्विजवर ॥ तयासि दक्षिणा देऊनि फार ॥ मार्गावर आणावे ॥ ८५ ॥ हातोहातीं उचलोनि मूर्ती ॥ नगरासि आणूं सत्वरगती ॥ ऐसी ऐकोनि वचनोक्ती ॥ चित्तीं भूपती संतोषला ॥ ८६ ॥ गावोगावींचे द्विजवर ॥ तयासि लेहूनि विनीतपत्र ॥ ब्राह्मणसमुदाय वाटेवर ॥ आणवी सत्वर नृप तेव्हां ॥ ८७ ॥ उदकअन्नाची ठायींठायीं ॥ स्वस्थता केली ते समयीं ॥ देवकार्य ह्मणोनि पाहीं ॥ संतोष जीवीं ब्राह्मणां ॥ ८८ ॥ मग देवासि घालोनि नमस्कार ॥ प्रार्थना करितसे नृपवर ॥ आतां कृपा करोनि मजवर ॥ चला सत्वर पांडुरंगा ॥ ८९ ॥ ऐसें विनवोनिया नृपती ॥ मूर्ति चालविली हातोहातीं ॥ बडवे पुजारी तळमळती ॥ परी नायके भूपती तयाचें ॥ ९० ॥ सत्ताधारी तो भूपाळ ॥ कोणाचेही न चले बळ ॥ नरनारी पाहतां सकळ ॥ भरले डोळे अश्रुपातें ॥ ९१ ॥ मूर्त्ति काढितांचि नृपवर ॥ वोस दिसतसे पंढरपुर ॥ जैसें प्राणावाचूनि शरीर ॥ तैसा विचार तो झाला ॥ ९२ ॥ असो इकडे रामराय भूपती ॥ मूर्ति चालवीत हातोहातीं ॥ परम उल्हास मानोनि चित्तीं ॥ नगराप्रती तो आला ॥ ९३ ॥ मेळवूनियां वैष्णव वीर ॥ कीर्तन करीतसे नृपवर ॥ दिंड्या पताकांचे भार ॥ मंगळ तुरें लाविले ॥ ९४ ॥ पूजा अभिषेक करोनि प्रीतीं ॥ सिंहासनीं स्थापीत पांडुरंग मूर्ती ॥ महा उत्सव करीत भूपती ॥ आनंद चित्तीं न समाये ॥ ९५ ॥ वस्त्रें भूषणें देऊनि फार ॥ रायें गौरविले वैष्णव वीर ॥ द्रव्य दक्षिणा वाटोनि थोर ॥ सुखी द्विजवर ते केले ॥ ९६ ॥ रत्नजडित अळंकार ॥ अमूल्य वस्त्रे मुक्ताहार ॥ लेवोनि पूजिला रुक्मिणीवर ॥ हर्षें अंतर कोंदलें ॥ ९७ ॥ मंदिरीं निद्रिस्त होता नृपती ॥ तंव स्वप्नीं सांगत पांडुरंगमूर्ती ॥ त्वां ये स्थळीं आणिलें मजप्रती ॥ तरी सांगतों रीती ते ऐका ॥ ९८ ॥ विचारूनियां न्यायनीत ॥

धर्मराज्य करावें निश्चित ॥ तुझा अन्याय होता किंचित ॥ मग मी येथ न राहे ॥ ९९ ॥ प्रेमळ भक्त आवडती मजसी ॥ आणि त्वां निरपराधें छळिलें त्यांसी ॥ तरी मी जाईन पंढरीसी ॥ पूर्व स्थळासी आपुल्या ॥ १०० ॥ ऐसा द्यात पढरीनाथें ॥ रात्रीं दाखविला असे त्यातें ॥ राजा होऊनि भयभीत ॥ असे सावचित्त सर्वदा ॥ १ ॥ पुजारी घेऊनि निजप्रीतीं ॥ प्रात काळीं अर्चन करिती ॥ स्नान करोनि येतसे भूपती ॥ पूजा आरती पाहातसे ॥ २ ॥ देवावरी अमूल्य अळंकार ॥ वास्तव सत्काराचें भय फार ॥ कवाडांसि कुलुपें अष्टही प्रहर ॥ होय सायकाळ तोंवरी ॥ ३ ॥ राजा देउळीं असल्यावीण ॥ नगरवासी अवघे जण ॥ कोणासि न होय दर्शन ॥ केलें सरक्षण या रीतीं ॥ ४ ॥ षोडशोपचारें करोनि जाण ॥ राजा करितसे नित्य पूजन ॥ घृतपाचित पकान्नें ॥ त्रिकाळ अर्पण होतसे ॥ ५ ॥ मोंवते कापूरदीपक ॥ सवदा जळती सम्यक ॥ पुष्पें कस्तूरी सुवासिक ॥ उपचार अनेक वोळंगती ॥ ६ ॥ परी पंढरीच्या वियोगाकारणें ॥ चैन न पडे देवाकारणें ॥ म्हणे प्राप्त जाहलें बदिखाने ॥ कर्वी सुटेन येथोनियां ॥ ७ ॥ असो इकडे आषाढ मासीं ॥ यात्रा मिळाली पंढरीसी ॥ संत महंत सिद्ध ऋषी ॥ चिंता मानसीं करिताती ॥ ८ ॥ निघाले वैष्णव वारकरी निश्चित ॥ तितुके मात्र आले तेथ ॥ इतर प्रापंचीक लोक समस्त ॥ म्हणती पढरीनाथ दूर गेला ॥ ९ ॥ ऐसें समजोनि ते अवसरीं ॥ राहती आपुलिया घरीं ॥ संत महंत यांनीं साजिरी ॥ केली पंढरी तेधवां ॥ ११० ॥ जेवीं पृथ्वीवरी मेघ वर्षतां ॥ आड वोहळाच्या भासती सरिता ॥ उष्णकाळ येतांचि वरवतां ॥ क्षुद आतौता न थारे ॥ ११ ॥ घणघायीं टिकती साचार ॥ तेचि जाणावे अमूल्य हिरे ॥ इतर गाराचा होतसे चूर ॥ परीक्षक नर जाणती ॥ १२ ॥ तावोनि काढितां सोज्वळ दिसे ॥ यालागीं कांचन म्हणावें त्यास ॥ पितळेसि काळिमा चढतसे ॥ परीक्षा असे हे त्याची ॥ १३ ॥ कां मोहऱ्यांसि गुंडाळूनि सूत ॥ टाकूनि

पाहिजे अग्नीआत ॥ तंतू न जळे तरी निश्चित ॥ विष उतरत त्याचेनी ॥ १४ ॥ तेवी विषम काळ जाहलिया प्राप्त ॥ त्रितापाचे नाना आवर्त ॥ ज्याचा निश्चय न टळेचि सत्य ॥ तरी तोचि संत म्हणावा ॥ १५ ॥ महा संकटीं न ढळेचि प्रेमा ॥ निग्रहें चालवीत आपुल्या नेमा ॥ तो भक्त आवडे पुरुषोत्तमा ॥ जैसा जीवात्मा या रीतीं ॥ १६ ॥ असोत हीं भाषणें बहुत ॥ दृष्टांत देणें कवीचें मत ॥ रामरायें नेता पंढरीनाथ ॥ तो पातले संत वारकरी ॥ १७ ॥ सिंहासनीं नसता रुक्मिणीवर ॥ वोस दिसतसे पंढरपुर ॥ जैसें प्राणावाचूनि शरीर ॥ खुंटे व्यापार इंद्रियाचा ॥ १८ ॥ नृपावाचूनि सैन्य संपत्ती ॥ का चंद्रावाचूनि जैसी राती ॥ ईश्वरकृपेनें निश्चिती ॥ कवित्वस्फूर्ती जेवि होय ॥ १९ ॥ ना तरी घरधन्यावाचूनि घर ॥ तैसें दिसे पंढरपुर ॥ चिंता करिती निरंतर ॥ परी उपाय अणुमात्र सुचेना ॥ १२० ॥ तंव निवृत्ति ज्ञानदेव सोपान ॥ नामा सावता वैष्णव जाण ॥ मुक्ताबाई गुणनिधान ॥ यात्रेसि संपूर्ण हे आले ॥ २१ ॥ कबीर आणि रोहिदास पाहीं ॥ गोराकुंभार गोणाबायी ॥ जनी दासी नामया पाहीं ॥ आणि राजायी भक्तराज ॥ २२ ॥ इतुकी मंडळी ते अवसरीं ॥ बैसली असे गरुडपारीं ॥ नामदेव तेथें कीर्तन करी ॥ तों भानुदास सत्वरी पातले ॥ २३ ॥ खांद्यावरी घेतला ब्रह्मविणा ॥ आलापे गीत गातसे नाना ॥ हृदयीं चिंतोनि रुक्मिणीरमणा ॥ नामस्मरणा करीतसे ॥ २४ ॥ ऐशा स्थितीनें ते अवसरीं ॥ भानुदास पातले गरुडपारीं ॥ संत महंता भेटोनि सत्वरीं ॥ मग नमस्कार करिती सद्भावें ॥ २५ ॥ विद्यानगरासि रुक्मिणीवर ॥ नेला म्हणवोनि वैष्णव वीर ॥ अवघेचि होऊनि चिंतातुर ॥ करिती विचार एकमेंका ॥ २६ ॥ रामरायाचा देखोनि भाव ॥ पंढरीहूनी गेले देवाधिदेव ॥ आपण इतुके भक्त वैष्णव ॥ तरी जावोनि केशव आणावा ॥ २७ ॥ ज्ञानराज बोलता ऐसें ॥ कोणीच उत्तर न देती त्यास ॥ म्हणती ईश्वर इच्छेस ॥ उपाय नसे आपुला ॥ २८ ॥ एक बोलती

अद्वैत भाव ॥ आपुलेच देहीं असे देव ॥ चराचरीं भरला असे सर्व ॥ याजवीण ठाव रिता नाहीं ॥ २९ ॥ एक म्हणती जातांचि तथें ॥ नृपवर कोपेल आम्हांतें ॥ फोडूनि ठेवील मदिरान्यांत ॥ मग यैसी मात्त फरावी ॥ १३० ॥ इंचि फार्य नव्हे आमुचेनें ॥ एसें अघीर बोलती वचन ॥ तों भानुदास साष्टांग नमन ॥ सत्ताफारणें करीतसे ॥ ३१ ॥ जरी आज्ञा घाल मज आतां ॥ तरी सत्वर आणितों पंढरीनाथा ॥ तुम्ही सांडूनि सफळ चिंता ॥ या स्थळीं तत्वता असिजे ॥ ३२ ॥ ऐसें बोलोनि त्यांस ॥ तेथोनि निघे भानुदास ॥ जेवीं मारुती जातां सीताशुद्धीस ॥ तैसा उल्हास वाटला ॥ ३३ ॥ रूपीं चितोनि पांडुरंगमूर्ती ॥ मुखीं गातसे नामकीर्ती ॥ स्मरण करितां दिवस रातीं ॥ सप्रेम विश्रांती सर्वदा ॥ ३४ ॥ देवासि घेऊनि येईन परतुनी ॥ म्हणोनि चित्तीं वाटला हरिख ॥ विदेह स्थिति जाहली देख ॥ ताहान-भूख विसरला ॥ ३५ ॥ अयाचित वृत्ती करून ॥ कोणीं अकस्मात दीधलें अन्न ॥ स्वसेतापें भक्षून ॥ पुढती गमन करितसे ॥ ३६ ॥ ऐशा रीतीं क्रमितां पथ ॥ विद्यानगरासि भानुदास येत ॥ ये स्थळीं आणिला पंढरीनाथ ॥ ऐसें पुसत लोकांसी ॥ ३७ ॥ रायाच्या भयें करोनि जाण ॥ कोणीच न बोलती वचन ॥ तों एक सत्पुरुष भेटला ब्राह्मण ॥ तो साकल्य निवेदन करीतसे ॥ ३८ ॥ म्हणे रामरायें आणूनियां पांडुरंगमूर्ती ॥ देउळीं स्थापिली असे निश्चिती ॥ परी दर्शन नव्हेचि कोणा-प्रती ॥ कुलुपें घालिती सर्वदा ॥ ३९ ॥ मग भानुदास विचारी मनांत ॥ आपणासि पाहिजे एकांत ॥ तरी शेजआरती झालिया निश्चित ॥ जावें त्वरित त्या ठाया ॥ ४० ॥ तये दिवसीं रात्रीं निश्चित ॥ राउळासि आला नृपनाथ ॥ शेजारती करोनि त्वरित ॥ मग स्वस्थानासि जात आपल्या ॥ ४१ ॥ पुजारी असती बाहेर ॥ तेही निद्रेनें व्यापिले फार ॥ तेथें भानुदास वैष्णव वीर ॥ द्वारासमोर येत तेव्हां ॥ ४२ ॥ एकास एक चार द्वारें ॥ तितुक्यांस कुलुपें असती थोर ॥ तों भाव केली

रुक्मिणीवरें ॥ गळोणि सत्वर पडिलीं तीं ॥ ४३ ॥ कपाटें मोकळीं सर्वही ॥ भानुदासासि आनंद वाटला जीवीं ॥ म्हणे मनोरथ पुरले ये समयीं ॥ मग आत लवलाहीं प्रवेशला ॥ ४४ ॥ तों ठाणठकारें जगजेठी ॥ समपद जोडिले विटे नेहटी ॥ दोन्ही कर ठेवूनि कटीं ॥ नासाग्रीं दृष्टी धरियेली ॥ ४५ ॥ साजिरे मुख देखताचि नयनीं ॥ भानुदासासि उल्हास मनीं ॥ मग बोल्यात्कारें राग धरोनी ॥ देवासि ते क्षणीं भाडतसे ॥ ४६ ॥ म्हणे रुक्मिणीपति पंढरीराया ॥ पायीं बिरुद बाधिले कासया ॥ तुझी बोलण्यासारखी नसेचि क्रिया ॥ माझिया प्रत्यया हे आले ॥ ४७ ॥ तुवा पुंडलीकासि दीधला वर ॥ कीं तेथें असावें निरंतर ॥ करावा जडमूढ उद्धार ॥ तो आठव अणुमात्र तुज नाहीं ॥ ४८ ॥ राजमंदिरीं एकात ॥ वरा पाहोनि बैसलासि येथ ॥ वस्त्रे अळंकार ल्यालासि बहुत ॥ नैवेद्यासि मिळत पकान्ने ॥ ४९ ॥ यास्तव सुरवाडे राहिलासि हरी ॥ आमुचा विसर पडिला अतरीं ॥ मग स्वमुखें अभंग केला सत्वरी ॥ तो सादर चतुरीं परिसावा ॥ १५० ॥ अभंग ॥ चंद्रभागेतीरीं उभा विटेवरी ॥ विठो राज्या करी पंढरीये ॥ १ ॥ ऋद्धिसिद्धि वोळंगती परिवार ॥ न लाहाती अवसर ब्रह्मादिका ॥ २ ॥ साडुनी इतुकें येथें बीजे केले ॥ कवणे चाळविले कानडीया ॥ ३ ॥ शंख भेरी मृदंग वाजतीकाहळा ॥ उपवड राऊळा होत असे ॥ ४ ॥ चापेल मार्जन सुगंध चर्चन ॥ मिवरा चंदन पाट वाहे ॥ ५ ॥ रंभा तिळोत्तमा उर्वशी मेनीका ॥ कामिनी अनेका येती सवे ॥ ६ ॥ कनकाचे पर्येळीं रत्नाचे दीपक ॥ सुंदर श्रीमुख वोवाळीती ॥ ७ ॥ रखुमाई आई ते जाहली उदास ॥ पुंडलीका कैसे पडिले मौन ॥ ८ ॥ भक्त भागवत सकळ पारूसले ॥ निःशब्दचि ठेले तुजवीण ॥ ९ ॥ धन्य पंढरपुर विश्वाचें माहेर ॥ धन्य भीमातीर वाळुवंट ॥ १० ॥ भानुदास म्हणे चाले आम्हासवे ॥ वाचाऋण देवें आठवावे ॥ ११ ॥ ओवी ॥ ऐसी करुणा वदोनिया ॥ भानुदास

लागतसे पायां ॥ म्हणे कां चाळविलासि देवराया ॥ सांग लवलाह्यां ये समर्था ॥ ९१ ॥ ऐसी करुणा ऐकोनि कानीं ॥ सन्निध जाहले चक्रपाणी ॥ भानुदासासि आलिंगुनी ॥ हृदयभुवनीं धरियेले ॥ ९२ ॥ मग काय बोलती पंढरीनाथ ॥ मी बंदिखान्यांत पडिलों येथ ॥ तुम्हींही निष्ठुर धरूनि चित्त ॥ आमुची परत न केली ॥ ९३ ॥ मजला टाकोनि प्रेमळ भक्ता ॥ सर्वथा जाऊं नको आतां ॥ तुम्हांवांचोनि मज तत्त्वतां ॥ क्षणही निरुता न कंठे ॥ ९४ ॥ ऐसें म्हणोनि करुणामूर्ती ॥ भानुदासासि प्रसाद देती ॥ तुळसी सुमनांचा हार निगुती ॥ गळां घालिती तयाचे ॥ ९५ ॥ म्हणे ठ ईक येऊनि सत्वर ॥ मज नेयी आपुल्याबरोबर ॥ ऐसें सांगतां रुक्मिणीवर ॥ हर्ष थोर वाटला ॥ ९६ ॥ पुष्पमाळेच्याबरोबर ॥ आला नवरत्नांचाहार ॥ भानुदास नेणती साचार ॥ आले सत्वर बाहेरी ॥ ९७ ॥ मागुती लाक्षी जगज्जीवन ॥ चक्रांकुशपासि केलें यत्न ॥ प्रातःकाळ होतांचि त्वरेनें ॥ नृपनंदन पातला ॥ ९८ ॥ काकडआरती करितां साचार ॥ तों कंठीं न दिसे नवरत्नहार ॥ म्हणती येथें कोण आला चोर ॥ कोपे नृपवर पुजाऱ्यासी ॥ ९९ ॥ तस्कर पाहावयासि साचार ॥ अष्टदिशा धावले हेर ॥ तों भानुदास वैष्णव वीर ॥ त्यांणीं सत्वर देखिला ॥ १६० ॥ गंगातीरीं करोनि स्नान ॥ करीत बैसला विठ्ठल-स्मरण ॥ कंठीं झळकती दिव्यरत्नें ॥ सेवकजन देखती ॥ ६१ ॥ त्यांणीं धरोनि वैष्णव वीर ॥ रायापासीं आणिला सत्वर ॥ म्हणती धरोनि आणिला चोर ॥ हार दाखविला ॥ ६२ ॥ चित्तीं क्षोभला नृपवर ॥ सक्रोध बोले तयासि उत्तर ॥ धरोनि आणिला आहे तस्कर ॥ तरी सुळावर त्यासि घाला ॥ ६३ ॥ विवेक नीत न विचारून ॥ सेवकांसि आज्ञा केली त्याणें ॥ होणार भविष्य सर्वथा नेणें ॥ मायाभ्रांतीनें वेष्टिला ॥ ६४ ॥ असो भानुदास वैष्णव वीर ॥ तयासि दंड केला फार ॥ सूळ देऊनि खांद्यावर ॥ माथां सेंदुर घातला ॥ ६५ ॥

भानुदास प्रेम चित्तीं हृदयीं चिंतिली पांडुरंगमूर्ती ॥ म्हणे देवाधिदेवा रुक्मिणीपती ॥ उत्तम युक्ती त्वा केली ॥ ६६ ॥ तुज न्यीवयासि आलों साचार ॥ यास्तव गळा घातला हार ॥ आता देवविटोसि सुळावर ॥ माया अणुमात्र ॥ तुज नाहीं ॥ ६७ ॥ आता जैसें चित्तीं असेल जाण ॥ तैसेचि देहासि येईल मरण ॥ परी सर्वथा न सोडीं तुझें स्मरण ॥ मग स्वमुखें वचन बोलिले ॥ ६८ ॥ अभंग ॥ आकाश कडकडोनिया पाहे ॥ कीं ब्रह्मगोळ भंगला जाय ॥ वडवानळ त्रिभुवन खाय ॥ तैं तुझी वाट पाहे विठोबा ॥ १ ॥ सतही समुद्र समरस होती ॥ लय पावेल हे क्षिती ॥ पंचभूतें प्रळय पावती ॥ तैं तूं माझा सांगाती विठोबा ॥ २ ॥ भलतैसें पडो भारी ॥ नामा न टळों निर्धारीं ॥ पतिव्रता प्राणेश्वरी ॥ भानुदास म्हणे अवधारी विठोबा ॥ ३ ॥ ओव्या ॥ ऐसा निश्चय करोनि तेथें ॥ कंठ जाहला सद्गदित ॥ तों तयासि पावले पंढरीनाथ ॥ तें ऐका निजभक्त भाविक हो ॥ १६९ ॥ सूळ रोविला होता जेथ ॥ त्यासि पल्लव शाखा फुटल्या बहुत ॥ पुष्पीं फळीं सुशोभित ॥ आश्चर्य वाटत सकळांसी ॥ १७० ॥ सूळ वृक्ष झाला म्हणवून ॥ रायासि सांगती सेवकजन ॥ ऐसे ऐकताचि वचन ॥ नृपनंदन दचकला ॥ ७१ ॥ राजा अनुताप धरोनिया ॥ सत्वर चालिला पाहावया ॥ तों भानुदास नेत्र झाकोनिया ॥ पंढरीराया आठवित ॥ ७२ ॥ ऐसे देखोनि नृपवर ॥ घालीत साष्टांग नमस्कार ॥ म्हणे तूं निधडा वैष्णव वीर ॥ मी नेणेचि पामर मूढमती ॥ ७३ ॥ भानुदास पाहे उघडोनि नेत्र ॥ तो सूळाचा वृक्ष जाहला थोर ॥ म्हणे मज पावला रुक्मिणीवर ॥ अघटित विचार हा झाला ॥ ७४ ॥ भानुदासासि धरोनि हातीं ॥ राउळासि घेऊनि येत भूपती ॥ तों म्लानमुख पांडुरंग-मूर्ती ॥ अश्रु वाहती नेत्रांतुनी ॥ ७५ ॥ ऐसें देखोनि नृपवर ॥ घातला साष्टांग नमस्कार ॥ हात जोडोनि देवासमोर ॥ मधुरोत्तरें विनवीतसे ॥ ७६ ॥ म्हणे मी अपराधी नाना ॥ तुझ्या भक्ताची केली छळणा ॥ रामरायाची ऐकूनि करुणा ॥ पंढरीराणा काय वदे ॥ ७७ ॥

आता मार्तंडरूप आठवूनि अंतरीं ॥ सुखें राहावें आपुले नगरीं ॥ भानुदासाच्या बरोबरी ॥ जातों परंतु पाहावया ॥ ७८ ॥ यावरी आम्ही करिसील जर ॥ तरी अनर्थ येथें होईल थोर ॥ ऐसें वचता शार्ङ्गधर ॥ निवांत नृपवर राहिला ॥ ७९ ॥ भानु म्हणे रुक्मिणी कांता ॥ कैसा उपाय करावा आतां ॥ माझी तों नाहीं सामर्थ्यता ॥ मी नेऊनि बहुतां तुज नकळ ॥ १८० ॥ ऐसी ऐकूनि वचनावळी ॥ सांगत करीत रुक्मिणीपती ॥ तत्काळ प्रहान जाहली मूर्ती ॥ विस्मित चित्तीं नृपनाथ ॥ ८१ ॥ भानुदास खंतोय पावूनि मना ॥ साष्टांग घातलें करीतसे ॥ जय श्रीविठ्ठल बोलोनि वचन ॥ रुक्मिणीरमणा उचलिलें ॥ ८२ ॥ सवळीमाडानि जगजेठी ॥ भानु म्हणतो वाळ गुणगोटी ॥ आज परमानंदें भरली सृष्टी ॥ होईल भेटी संतांच्या ॥ ८३ ॥ ऐशा रीतीं क्रमिता पंथ ॥ भानु म्हणे आहे पंढरीसि त्वरित ॥ पलनांथीं वैष्णव भक्त ॥ उतरे स्नानार्थ ते समयीं ॥ ८४ ॥ धांवें पुढानि ते वेळीं ॥ वस्त्र घालीन सत्वर पाळीं ॥ संवळीत हात पननाळी ॥ ते थोर तत्काळीं वाहत ॥ ८५ ॥ वरील पूर मनसावरी ॥ सत्रींचें पायीं जाहलें पुरी ॥ भानुदास विस्मित अंतरीं ॥ मग रुक्मिणीवर काय म्हणे ॥ ८६ ॥ सत महंत गरुडपारीं ॥ वाट पाहाती निरंतरी ॥ तयां जाऊनि सांग सत्वरी ॥ यतील सामोरी मज आतां ॥ ८७ ॥ ऐसें सांगतो जगजीवन ॥ भानुदास संतांच्या मनें ॥ गरुडपारीं सत्वर येऊन ॥ हास्यवदन बोलत ॥ ८८ ॥ पंढरीर्थ विठ्ठलमूर्ती ॥ घेऊनि आलों मी निश्चितीं ॥ ऐसी ऐकोनि वचनोक्ती ॥ उल्हास चित्तीं सकळांच्या ॥ ८९ ॥ शिबिका घेऊनि सत्वर ॥ सकळ चालिले सामोरे ॥ दिंड्यापताकांचे भार ॥ मंगळ सुरें वाजती ॥ १९० ॥ वैष्णव करिती हरिकीर्तन ॥ गाती नाचती प्रीतीकरून ॥ क्षेत्रवासी सकळ जन ॥ थोर लहान चालिले ॥ ९१ ॥ म्हणती भानुदासाचा उपकार ॥ आम्हीं फेडावा कोठवर ॥ धन्य हा निधडा वैष्णववीर ॥

सारंगधर आणिला ॥ ९२ ॥ सकळ मंडळीसहित निश्चिती ॥ पद्मतीर्थीं चालत येती ॥ दृष्टीसि देखूनि पाडुरंगमूर्ती ॥ सप्रेम घालिती दंडवत ॥ ९३ ॥ भानुदासाने लावूनि हात ॥ शिबिकेत घातला पंढरीनाथ ॥ जयजयकारें गर्जती भक्त ॥ बुका उधळित निजहस्तें ॥ ९४ ॥ ऐसा मिरवत रुक्मिणीपती ॥ चंद्रभागेसि तेव्हां आणिती ॥ स्नान घालोनि सत्वरगती ॥ देऊळाप्रती मग येत ॥ ९५ ॥ सुदिन मुहूर्त तये दिनीं ॥ मूर्ति स्थापिली सिंहासनीं ॥ तंव भानुदासासि कैवल्यदानीं ॥ वरद वाणी बोलत ॥ ९६ ॥ न फिटेचि तुझा उपकार ॥ दृष्टीसि दाविलें पंढरपुर ॥ मी तुझे वंशीं अवतार ॥ घेईन साचार निश्चिती ॥ ९७ ॥ ऐसें वदता जगदुद्धार ॥ भक्त गर्जती जयजयकार ॥ क्षेत्रवासी नारीनर ॥ आनंद थोर त्यासि जाहला ॥ ९८ ॥ अवर्षणीं पडला जैसा घन ॥ कां शरीरात आला मरणीं प्राण ॥ तैसा उत्सव मानोनि मनें ॥ लोक संतर्पण करिती ॥ ९९ ॥ आपुलाल्या मतें नरनारी ॥ साकरा वाटिती घरोघरीं ॥ वैष्णव येऊनि गरुडपारीं ॥ कीर्तनगजरीं डुल्लती ॥ २०० ॥ यापरी भानुदास आख्यान ॥ गातसे एका जनार्दन ॥ संत महंत ऐकोनि कीर्तन ॥ तटस्थ होऊन राहिले ॥ १ ॥ आपला पूर्वज भानुदास ॥ त्याचें चरित्र गायिलें सुरस ॥ नादब्रह्मचि आलें मुसें ॥ कीर्तनीं घोष करिताती ॥ २ ॥ मग उजळोनि मंगळ आरती ॥ वोवाळिला श्रीरुक्मिणीपती ॥ तेथें दासानुदास महीपती ॥ खिरापती वाटितसे ॥ ३ ॥ स्वस्ति श्रीभक्तलीलामृत ग्रंथ ॥ श्रवणेंचि पुरती मनोरथ ॥ प्रेमळ परिसोत भाविक भक्त ॥ अष्टादशाध्याय रसाळ हा ॥ २०४ ॥

अध्याय १८, अभंग २, ओव्या २०४.

Appendix V

परिशिष्ट ५

शिरगांवकर भीमस्वामीकृत भानुदासचरित्र

॥ श्रीराम ॥ भानुदास स्वामी संतांमाजी श्रेष्ठ । प्रपंचाचे कष्ट दूर जया ॥ १ ॥ कापड आणाया गेले संग्यासवें । अद्भुतचि देवें केलें तेथें ॥ २ ॥ खेप भरोनीया येता मार्गावरी । पाळें दिल्ही वरी गांवापाशी ॥ ३ ॥ यांचें पाठ मध्यें होतें हे गांवांत । कीर्तनासी जात ऐकावया ॥ ४ ॥ सर्वांनी वर्जीलें परी न राहीले । स्मरणी रंगले देवानीचे ॥ ५ ॥ ठेवा वेंथामध्यें दीड पाडें पांची । टाकता तयांची शुद्धि ऐसी ॥ ६ ॥ वेढ सारे रानी दिरळ होंयानी । रक्षो तया मनीं भावना हे ॥ ७ ॥ चोर आले घाडी मोठी अकस्मात । लुटोनीया नेत सर्व यांचें ॥ ८ ॥ भानुदास आले कीर्तन ऐकोनी । पाहाती नयनीं जाहालें तें ॥ ९ ॥ माझें सर्व देवा केलेंसी जतन । परी सर्गी जाण माझे की हे ॥ १० ॥ तेव्हां पांडुरंगें चोर बध केले । प्रात:काळीं आले घेवोनीया ॥ ११ ॥ ज्याचें त्यासी दिल्हें आनंद जाहाला । वाटीलें द्विजाला आपुलें जें ॥ १२ ॥ सोडोनीया व्यवसाय विणा हाती । भजनी रंगती अहिर्निशी ॥ १३ ॥ संताचें चरित्र गाता आणि ऐकतां । होय सार्थकता भीम म्हणे ॥ १४ ॥

॥ श्रीराम ॥ घरी आले बहु दरिद्रें पिडीलें । कांता तेव्हां बोले दीनरूपें ॥ १ ॥ प्रात:काळीं गंगास्नान करोनीया । गीतापाठी तया प्रीति फार ॥ २ ॥ योगक्षेम त्यांचा वाहातों मी ऐसें । अनन्य चिंतासें भजती जे ॥ ३ ॥ श्लोक पाहोनीया विस्मित जाहाले । हरताळ लावीलें तयालागी ॥ ४ ॥ देव घरी आले माल घेवोनीया । कांता

पुसे तया कोण तुह्मी ॥ ५ ॥ कृष्णाजीपंत हें नाम सांगीतलें । द्रव्यें अन्न केलें तृप्त तये ॥ ६ ॥ जन्मवरी खातां न सरेचि ऐसें । देवोनी विश्वासें बोलीयले ॥ ७ ॥ तुमच्या भ्रतारासी निरोप सांगावा । ६८ धरुनी जीवामाजीं ऐका ॥ ८ ॥ आमुचे दाढीं त्यांनीं लाविली हार्ताळ । पुसोनी तात्काळ टाका सांग ॥ ९ ॥ इतुकें सांगोनीया गेले तों हे आले । घरीं जों पाहीलें अद्भुतचि ॥ १० ॥ पुसता कांतेसी सांगे वर्तमान । नेत्रीं वाहाती जाण अश्रुधारा ॥ ११ ॥ तात्काळ हार्ताळ पुसोन टाकिली । भक्तासी सांभाळी हेचि सत्य ॥ १२ ॥ कांतेसी म्हणती सर्वस्वाचें दान । करावेंसें जाण वाटताहे ॥ १३ ॥ बोलावोनी विप्र फडशा केला सारा । म्हणे ज्याचें त्याला समर्पिलें ॥ १४ ॥ ऐसें हरिभक्त उदास मानसीं । देव तयापासी भीम ह्मणे ॥१५ ॥

श्रीराम ॥ भानुदास क्षेत्र पैठणाहूनीया । पंढरी जावया सिद्ध जाले ॥ १ ॥ आले पंढरीस नेम याचा असे । प्रेमाच्या उल्हासें गावें भावें ॥ २ ॥ देवापुढें पांच अभंग ह्मणावे । देवें माळे द्यावे अकस्मात ॥ ३ ॥ येका शिष्यें यासी पितांबर दिला । आले राउळाला नित्या ऐसे ॥ ४ ॥ तेथें होता सडा चिडाचिडीत जालें । पितांबरामुळें काय केलें ॥ ५ ॥ राखोनी नमन केलें वरिच्यावरी । तये अवसरीं माळ न ये ॥ ६ ॥ बहुत श्रम जाले न ये माळ जेंव्हा । उपेक्षीले तेंव्हां ह्मणती देवें ॥ ७ ॥ तेथोनी निघाले येका गांवा आले । लोकासी बोलीले तेथीलीया ॥ ८ ॥ प्रहररात्रीसी विघ्न येईल येथें । मारोनी तयातें टाका तुह्मी ॥ ९ ॥ पंढरीहून ते होते दोन कोस । ह्मणती जीवा नाश करूं आता ॥ १० ॥ चौबे गडी केलें तयांसी ह्मणती । माझिये मोटेसी बांधोनी न्या ॥ ११ ॥ तया गांवामध्यें नेवोनी ठेवावें । मग तुह्मीं यावें पंढरीस ॥ १२ ॥ आज्ञा ह्मणोनीया नेली मोट गांवीं । ठेविली जाणावी गांवांमध्यें ॥ १३ ॥ निघोनीया गडी गेल्यावरी लोक । मार करिती देख तयांवरी ॥ १४ ॥ बहु केला मार परी न लागेचि ।

मार्गे प्रल्हादाची साक्ष यांसी ॥ १५ ॥ वीट नेऊे मोटे सोडोनी पाहीले । स्वामींस देखीलें अकस्मात ॥ १६ ॥ नमन करितां पायांस लागती । तेथोनीया येती पढरीस ॥ १७ ॥ निग्रह करीतां म्हणे पांडुरंग । सोबळ्याचें मग स्मरण दिल्हें ॥ १८ ॥ समाधान केलें माऊेसी दाखलें । पैठणासी आले आनंदानें ॥ १९ ॥ पुढील चरित्र विस्तार बहुत । भीम गाय नित्य सतलीला ॥ २० ॥

॥ श्रीराम ॥ अनेगोंदीमध्यें होता नृपनाथ । कानडा विख्यात रामराजा ॥ १ ॥ रामाईचा भक्त होता तो अत्यंत । साक्षात्कार सत्य होता मोठा ॥ २ ॥ अभिमान तया जाहाला अत्यंत । वैभवी आणि भक्त मीच म्हणे ॥ ३ ॥ हेमाडपतही तेथें होते जाण । त्यांसी गजानन साक्ष सदा ॥ ४ ॥ छके बिभीषणें नेलें होतें त्यासी पिशाच-लिपीसी आणिलें ज्यांनी ॥ ५ ॥ रायापासी येतां बोलिला अभिमानें । आम्हां ऐसा कोण भक्त मोठा ॥ ६ ॥ वैभवही थोर भक्तही मी थोर । देवी माझी थोर सर्वांमध्यें ॥ ७ ॥ हेमाडपंतासी न साहवे जेव्हां । बोलीयले तेव्हां निशंकचि ॥ ८ ॥ पढरीत पांडुरंग देव येक । ऐसा नाहीं दख भूमंडळीं ॥ ९ ॥ तयाचाचि भक्त नामदेव संत । वैभव अद्भुत तेथें आहे ॥ १० ॥ रायासी आवेश येवोनी निघाला । सर्व वैभवाला घेवोनीया ॥ ११ ॥ यांनीं करोनीया गणपतीच्या ध्याना । विनंती माझ्या वचना सांभाळावें ॥ १२ ॥ अभय होताचि चालीयले मार्गी । सेना दोहीं भागीं चतुरंग ॥ १३ ॥ आठ कोसांवरी राहिली पढरी । भक्तसाह्य करी पांडुरंग ॥ १४ ॥ अतर्बुचि माव करी तो देवाजी । द्वारकाचि दुजी ऐसे भासे ॥ १५ ॥ घोड्यावरी स्वार होवोनी आपण । आले नारायण रायापुढें ॥ १६ ॥ रायें पाहतांचि म्हणे नामदेव । नमन सद्भावें करोनी पुसे ॥ १७ ॥ कोणाजीपंत हें नाम जाणवीलें । नामदेवें केलें पांगे आम्हां ॥ १८ ॥ सांगोनीया जातां म्हणतसे राव । धन्य हें वैभव वाटतसे ॥ १९ ॥ मुळोनीया आम्ही

पाण्डांच्या पायांसी । लागलों हे ऐसी भ्रांति जाली ॥ २० ॥ ऐसीं बहु सांगों पांडुरंग दोवी । न धरवे जीवीं ब्रम्हादिका ॥ २१ ॥ पंढरी येवोनी पाहाताती तंव । कळस कोट सर्व सुवर्णाचे ॥ २२ ॥ हेमाडपंतासी घेवोनी वाड्यात । रत्नें वस्त्रे घेत अमोलिक ॥ २३ ॥ येता कचेरींत बैसले लोडासी । नामदेव त्यासी मानीयले ॥ २४ ॥ नमन करोनी वस्त्रें रत्ने दिल्हीं । आलिंगने जालीं पुढे ऐका ॥ २५ ॥ राव म्हणे नाम सांगावे आपुलें । नारायण भले म्हणती आम्हा ॥ २६ ॥ नामदेवाचीये असो कोठीवरी । त्याचा आम्हावरी लोभ फार ॥ २७ ॥
तुम्ही सर्व आजि यावें भोजनासी । मग भेटी त्यासी करूं तुम्हा ॥ २८ ॥
अधिकारासारीखे बैसवीले पाहा । आली वाढावया जगन्माता ॥ २९ ॥
नामदेवाची हे पत्नी म्हणऊन । राव तये नमन करीताहे ॥ ३० ॥
पुसता सांगती नारोपंतकांता । कोठीवरी होता तयाची हे ॥ ३१ ॥
हेमाडपंतासी म्हणे राव काय । वैभव हे आहे न वर्णवे ॥ ३२ ॥
ऐकताचि याच्या नेत्रीं आले अश्रु । म्हणती सर्वेश्वरु जाला सारें ॥ ३३ ॥
भोजन करोनी चंद्रभागेतीरीं । पाहाताती नेत्री कौतुकासी ॥ ३४ ॥
शतावधि दासी भार्डी घासितासी । विजे ऐशा दिसती राजयासी ॥ ३५ ॥
रासाईही त्यात होती वोळखोन । साष्टांग नमन करी तये ॥ ३६ ॥
म्हणे माते ऐसे काय हें करीसी । सांग निश्चयेंसीं आजि मज ॥ ३७ ॥
म्हणे देवी तुझा देव आहे तेथें । चाकरीचे नाते येथें आहे ॥ ३८ ॥
विस्मये होवोनी म्हणे दासीपण । सोडवीन जाण चिंता नाहीं ॥ ३९ ॥
नामदेवाचीये भेटीसी चालीला । राउळात आला देवाचिये ॥ ४० ॥
खांद्यावरी वीणा डोईस बोडके । पाई चाळ निके बांधीयले ॥ ४१ ॥
गांडीत लंगोटी भजनीं रंगले । रायाने देखीले अकस्मात ॥ ४२ ॥
रायासी सांगती हेचि नामदेव । ऐकता सद्भाव जाला मोठा ॥ ४३ ॥
संतदर्शनाचा माहिमा अद्भुत । राव दंडवत पडे पाईं ॥ ४४ ॥
उठवोनी यानीं आलिंगन दिल्हे । प्रेमे गहिवरले नेत्र तेव्हा ॥ ४५ ॥

म्हणे राय रामाईम मुक्त करा । देय गात्रा नाग आहे जी हा ॥ ४६ ॥
नामदेव म्हणती दासीपण आहे । देवपण पाहे त्वरीच ॥ ४७ ॥
सत्कर्तुनीया दूर केल्यावर । सत्ता तिळमात्र न चाळेचि ॥ ४८ ॥
मनामध्ये राव बहु संकोचला । दासीलागीं केला देव आम्ही ॥ ४९ ॥
इचा देव धनी कोण तोचि पाहू । तयालागीं वाहूं जीवप्राण ॥ ५० ॥
आळा देवाल्यांत पांडुरंगापुढे । निघदासी गाढे आरंभीलें ॥ ५१ ॥
म्हणे दासी नेऊं किंवा प्राण देऊं । उपोषणे बहु आरंभिली ॥ ५२ ॥
सात दीन जेव्हां उदकही न घे । पांडुरंगराय आले तेव्हां ॥ ५३ ॥
येके दिसीं मज नई अनगोंदी । आणिकही सधी ऐक येक ॥ ५४ ॥
माझीया सतांचा होतां अपमान । सात्पाळ तथान वर्हन मी ॥ ५५ ॥
पतूर्व परानी नव्हे कैसें ऐका । मनुर्येचि दया उर्मी केली ॥ ५६ ॥
बहू प्रेतेंनें नव्हे देव अनेगोंदीं । करी पूजाविधि मनामार्थे ॥ ५७ ॥
मानुदास सम तर्थे गेले जेव्हां । अपमान तव्हां केला रायें ॥ ५८ ॥
फळ्ताचि सत नत्रां आले अश्रु । म्हण सर्वेश्वरु जाता आतां ॥ ५९ ॥
पांडुरंग राया म्हणती आमुची माफ । उगवली देस जाऊ आतां ॥ ६० ॥
आमुचो प्रतिमा फानी पैसवी । मनऐसे मावी सत माहे ॥ ६१ ॥
राव म्हणे येका दिसांतचि जायें । मग देवरायें मान्य केलें ॥ ६२ ॥
मानुसें देवा उचलोनी घेतलें । तव्यामाजीं नव्हे अकस्मात ॥ ६३ ॥
जाला गुप्त चद्रमार्गेत निजाला । जयजयकार जाला पढरीसी ॥ ६४ ॥
आणीयला देव धन्य संतराय । मानुदासा सर्व नमना येती ॥ ६५ ॥
प रीचा राव प रीस आला । आनंद जाहाला यात्रेलागीं ॥ ६६ ॥
कथेचा विस्तार आहेच बहुत । मीमें सकळित वर्णीयलें ॥ ६७ ॥

॥ इति श्रीमानुदास आख्यान संपूर्ण ॥ शुभ भवतु ॥

Appendix VI

परिशिष्ट ६.

एकनाथी भागवत.

अध्याय १ ला—ओंव्या १३१-१३४.

वंदूं भानुदास आता ॥ जो का पितामहाचा पिता
ज्याचेनि वंश भगवंता ॥ झाला सर्वथा प्रियकर ॥ १३१ ॥

जेणें बाळपणीं आकळिला भानु ॥ स्वयें झाला चिद्भानु
जितोनि मानाभिमानु ॥ भगवत्पावनू स्वयें झाला ॥ १३२ ॥

जयाची पदबंधप्राप्ती ॥ पाहों आली श्रीविठ्ठलमूर्ती
कानींचीं कुंडलें जगा ज्योती ॥ करिता रातीं देखिला ॥ १३३ ॥

तया भानुदासाचा चक्रपाणी ॥ तयाचाही सुत सुलक्षणी
तयासी सूर्यनाम ठेवूनी ॥ निजीं निज होऊनी भानुदास ठेला ॥ १३४ ॥